**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०६**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २४ /१०/२०१८

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -०६ सोमवार दि. २९ /१०/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा.** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**सोमवार दिनांक - २९ /१०/२०१८ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ५१ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी यापदी अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढविणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ५२ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारिका यापदी १] शेख नईम युसुफ, लॅब टेक्निशियन ,२] गायकवाड शिल्पा प्रभाकर, परिचारिका,३] सुलभा प्रकाश पवळ, परिचारिका ,४] अनिता रमेश तोडमल, परिचारिका यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ५३ | एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ मनपा हिश्शामधून एकात्मिक गृह निर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अनुदान हिश्शामध्ये तरतुद वर्ग करण्ेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ५४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१८-२०१९ च्या विद्युत विभागाच्या अर्थसंकल्पीय रकमेमध्ये बदल करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट . |
| ५५ | अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक -५ बोल्हेगांव कमान ते गणेश चौकापर्यत रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे या कामाकरिता नागरी क्षेत्रात नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०१७-२०१८ अंतर्गत ई - निविदा क्र. १७६३ या निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट |

| | |
|---|---|
| ५६ | अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव स.नं.२२०/२२१ पैकी या जागेत कचरा संकलन वाहतुक करणेकरीता रॅम्प बांधणेचा १४ वा वित्त आयोग सन २०१८-२०१९ अंतर्गत ई- निविदा क्र.-१८५७ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ५७ | अहमदनगर महानगरपालिका सार्व . उदयान विभागाकरिता आर.सी.सी. सिमेंट बाकडे पाठीसह- १८४ नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ५८ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी उपनगरातील महालक्ष्मी व गंगा उदयानमध्ये नागरीक व युवा पिढीसाठी सेल्फी पॉईट उभारणी करून घेणेकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिानियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ५९ | प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत AHP मोरचुदनगर स.नं. ५ (संजयनगर) येथे २९८ सदनिका विकसीत करणे करीता NGO/NPO/Contractr /Agency ची नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या व प्राप्त होणा-या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्टवर निर्णय घेणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ६० | अर्जदार श्री. मुल्ला अताउर रहिमान(ट्रस्टी),गवळी डबरा,६३४४ या मिळकतीचे वॉर्ड क्र.८ बील क्र. ७०२ वरील करआकारणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १३२(१) ब नुसार सन २००३-०४ पासुन बीलाची दुरूस्ती करून रक्कम निर्लेखित करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- १] विषय क्रमांक- ५१ ते ६० च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- ५१ सोमवार दिनांक २९/१०/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी यापदी अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढविणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ :- १. डॉ.सौ. रेणुका प्रणव जोशी यांचा दिनांक ११/४/२०१८ रोजीचा अर्ज

२. कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह यांचेकडील जा.क्र.५६ दि.१८/४/१८ अन्वयेचा प्रस्ताव

३. कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह यांचेकडील जा.क्र.८३ दि.०३/०५/१८ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये की, डॉ.सौ. रेणुका प्रणव जोशी यांचा दिनांक ११/४/२०१८ रोजी विनंती अर्ज देवुन दरमहा मानधन वाढवुन रू.३०,०००/- मासिक मानधन मिळणे बाबत विनंती केलेली असुन सदर अर्जाच्या अनुषंगाने इकडील जा.क्र. आस्था.३८५ दि.२३/०४/२०१८ अन्वये प्र. वैद्यकीय अधिक्षक, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांना पत्र देवुन मानधन वाढ विषयी संदर्भात स्वयंस्पष्ट अभिप्रायाहस अहवाल सादर करणे बाबत सुचित केलेले होते.

त्यानुषंगाने प्र. वैद्यकीय अधिक्षक, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवाखाना व सुतिकगृह ५६ दि.१८/४/२०१८ अन्वयेच्या अहवालामध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता करार पध्दतीने मानधनावरील डॉ. सौ. रेणुका प्रणव जोशी यांचे तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदाचे सध्याचे सध्याचे दरमहा मानधन रू.२००००/- असुन त्यांचा अनुभव व सध्याच्या महागाईचा विचार करता त्यांच्या मागणी विनंती अर्जाच्या अनुषंगाने दरमहा मानधनामध्ये नियमाप्रमाणे वाढ देणे उचित वाटते. असे नमुद करून सुचित केलेले होते. तद्नंतर संदर्भिय क्र.३ च्या अहवालाच्या अनुषंगाने आरोग्य विभागाकडील आर.सी.एच. योजने अंतर्गत मानधनावरील वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणे डॉ.सौ. रेणुका प्रणव जोशी यांना दरमहा रू.२८,०००/- मानधन देणे बाबत शिफारस केलेली आहे.

यापुवी कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील वेळोवेळी अहवालाच्या अनुषंगाने कै.बा.दे. दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदासाठी अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर सहामहिन्याकरीता करारबध्द नियुक्तीसाठी थेट पध्दतीने( Walk In Interview)नुसार वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन उमेदवारांच्या मा. निवड समितीमार्फत मुलाखती घेवुन उमेवारांची निवड करून भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली असुन त्यामध्यमे तात्पुरतया स्वरूपात सदर पदाचे रू.२०,०००/- इतके मानधन दर्शविण्यात आलेले होते.

सद्यस्थितीमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मनपा अधिनियमामधील ५३ च्या तरतुदीनुसार मा.स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने कै.बा.दे.दवाखान्याकरीता करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन वेळोवेळी सहा-सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदावर संबंधितांची रू.२०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्त्यांबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

वरील अर्जाच्या अनुषंगाने व त्यावरील प्र. वैद्यकीय अधिक्षक, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचे कडील अहवालाच्या अनुषंगाने करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदावर नियुक्ती करीता मानधनामध्ये वाढ

निश्चित करून कार्यवाही करणेस झालेस सदरचा मानधनवाढी बाबतचा विषय सद्यस्थितीमधील मनपाची आर्थिक परिस्थिती व धारणात्मक स्वरूपाची बाब असल्याने प्रस्तुत प्रकरणी मा.स्थायी समितीची पुर्व मान्यता घेणे उचित होईल.त्यानुषंगाने दरमहा मानधन बाबत माहिती तपशिल खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ.नं. | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | विभाग | सध्याचे दरमहा मानधन रक्कम रू. | संबंधितांच्या मागणी अर्जानुसार दरमहा मानधन रू. | संदर्भ क्र.३ च्या अहवाला मधील शिफारस दरमहा मानधन रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी | कै.बा.दे.दवा. | २०,०००/- | ३०,०००/- | २८,०००/- |

तरी उपरोक्त वरील अर्ज व कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील अहवालाच्या अनुषंगाने कै.बा.दे.दवाखान्याकरीता करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदावर नियुक्ती करीता दरमहा मानधनामध्ये वाढ निश्चिती बाबतचा प्रस्ताव निर्णयाकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत प्रस्तृत प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवून मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे प्र.सहा.आयुक्त,आस्थापना यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,स्थयी समितीत मानपाची आर्थिक स्थिती लक्षात घेवून योग्य निर्णयास्तव सविनय सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अर्जदार वैद्यकीय अधिकारी यांची करारबध्द मानधनावरील मुदत दि.८/७/२०१८ रोजी समाप्त झालेली असल्याने त्यांच्या पुर्ननियुक्तीचा प्रस्तावासह सदरचा मानधनवाढीचा प्रस्ताव एकत्रित सादर करण्यात यावा.शासनाकडील प्राथमिक आरोग्य केंद्र/उपजिल्हा रूग्णालय यामध्ये वैद्यकीय अधिकारी देण्यात येणारे मानधनाचे शासन निर्णय/शासन परिपत्रक यासह फेर सादर करावे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, अ नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची संमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आज युनियनने बंद पुकारला तो कशासाठी आहे.

अतिरीक्त आयुक्त श्री.वालगुडे :- पदोन्नती व सनुग्रह अनुदान करीता बंद पुकारला असून निवडसमितीने प्रस्ताव पाठविला या बाबत मा.जिल्हाधिकारी यांनी १२.३०वा.बैठक आहे.

मा.सभापती साहेब :- आजच्या सभेमध्ये महत्वाचे विषय असतांना सहाय्यक आयुक्त सभेमध्ये उपस्थती नाहीत.त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी यापदी अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढविणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ख्रिश्चन व गोसावी समाजा करीता दफनभुमी साठी जागा देणे बाबत सन २०१० मध्ये ठराव झालेला असून या ठरावाची अंमलबजावणी अदयाप झालेली नाही.

नगररचनाकार श्री.क्यातम :- मा.नगररचनाकार आज कोर्टाची तारीख असल्याने बाहेर गांवी गेले आहेत.ते आल्यानंतर माहिती घेवून आपणास कळविण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- श्री.क्यातम,आजच्या आज माहिती घेवून हा विषय मार्गी लावा.

सभेमध्ये युनियनचे सर्व पदाधिकारी व कर्मचारी सभागृहामध्ये घोषणा देत दाखल झाले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सभा दुपारी ४.०० वा.पर्यत तहकुब ठेवा.सर्व अधिका-यांना मा.जिल्हाधिका-यांकडे दुपारी १२.३० वा.बैठक असून त्यामध्ये कर्मचा-यांच्या पदोन्नती व सानुग्रह बाबत निर्णय होणार आहे.त्याकरीता संबंधिकत अधिका-यांना बैठकी करीता उपस्थित रहावे लागणार आहे.

मा.सभापती साहेब :- सभा आज दुपारी ४.०० वा.पर्यत तहकुब ठेवण्यात येत आहे.तहकुब सभा दुपारी ४.०० वा.सुरू होईल.सर्व अधिका-यांनी दुपारी ४.००वा.सभेकरीता उपस्थित रहावे.

--**--

**सभा सकाळी ११.४५ ते दुपारी ४.००पर्यत तहकुब.**

**दुपारी ४.०० वा.सभा सुरू.**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी यापदी अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढविणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- सध्या या कर्मचा-यांना किती मानधन आहे.

अतिरीक्त आयुक्त श्री.वालगुडे :-डॉ.सौ. रेणुका प्रणव जोशी वैद्यकिय अधिकारी पदावरील तात्पुरत्या स्वरूपात मानधावर कामकरीता असुन कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येते त्या कार्यरत आहे.त्यांना सध्या रू२० हजार मानधन आहे.त्यांनी दि. ११/४/२०१८ रोजी विनंती अर्ज देवुन दरमहा मानधन वाढवुन रू.३०,०००/- मासिक मानधन मिळणे बाबत विनंती केलेली आहे.

मा.सभापती साहेब :- प्रशासनाने किती मानधन देणे उचित राहिल असे सुचविण्यात आले आहे.

अतिरीक्त आयुक्त श्री.वालगुडे :- रक्कम रूपये २८ हजार देणे उचित राहिल असे ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद करण्यात आले आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केल्या नुसार रक्कम रूपाये २८ हजार दरमहा मानधन मंजूर करण्यात यावे.त्यांच्या अर्जाच्या तारखेपासून मानधन वाढ करावी.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अ.नगर मनपा कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता डॉ. सौ. रेणुका प्रणव जोशी यांचे तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदाचे सध्याचे दरमहा मानधन रू.२००००/- असुन त्यांचा अनुभव व सध्याच्या महागाईचा विचार करता त्यांच्या मागणी विनंती अर्जाच्या अनुषंगाने दरमहा मानधनामध्ये रक्कम रूपये ८,०००/- वाढकरून दरमहा रू.२८,०००/- मानधन देणे बाबत ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे. सदरची मानधनवाढ हि त्यांच्या मानधन वाढीच्या अर्जा पासुन म्हणजेच दिनांक ११/४/२०१८ पासून मंजूर करण्यात येत आहे. मानधन वाढीचा फरक देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता डॉ. सौ. रेणुका प्रणव जोशी यांचे तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदाचे सध्याचे दरमहा मानधन रू.२००००/- असुन त्यांचा अनुभव व सध्याच्या महागाईचा विचार करता त्यांच्या मागणी विनंती अर्जाच्या अनुषंगाने दरमहा मानधनामध्ये रक्कम रूपये ८,०००/- वाढकरून दरमहा रू.२८,०००/- मानधन देणे बाबत ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे. सदरची मानधनवाढ हि त्यांच्या मानधन वाढीच्या अर्जा पासुन म्हणजेच दिनांक ११/४/२०१८ पासून मंजूर करण्यात येत आहे. मानधन वाढीचा फरक देण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर,**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- ५२ सोमवार दिनांक २९/१०/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारिका यापदी १] शेख नईम युसुफ, लॅब टेक्निशियन ,२] गायकवाड शिल्पा प्रभाकर, परिचारिका,३] सुलभा प्रकाश पवळ, परिचारिका ,४] अनिता रमेश तोडमल, परिचारिका यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ :-** रक्तपेढी विभाग यांचेकडील जा.क्र.रक्तपेढी विभाग १५५दि.१७/०९/२०१८ चा प्रस्ताव.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की,रक्तपेढी विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.रक्तपेढी १५५ दि.१७/०९/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "रक्तपेढी विभागा करीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारीका यापदी १. शेख नईम युसुफ,लॅब टेक्निशियन २.गायकवाड शिल्पा प्रभाकर,परिचारीका ३. सुलभा प्रकाश पवळ,परिचारीका ४. अनिता रमेश तोडमल,परिचारीका यांची अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.१/५/२०१८ ते ३१/१०/२०१८ अखेर असुन सदरची मुदत ही दि.१/११/२०१८ रोजी पासुन समाप्त होणार असल्याने त्यांना तीन दिवससांचा तांत्रिक खंड देवून दि.४/११/२०१८ पासुन पुढील सहा महिन्याकरीता मानधावर पुर्ननियुक्ती करणे बाबत " सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभाग याचेकडील जा.क्र.रक्तपेढी विभाग ३१७दि.२६/३/२०१८अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्र.८ दिनांक १६/७/२०१८ च्या पुर्व मुजुरी ठराव नुसार रक्तपेढी विभागामध्ये १. शेख नईम युसुफ,लॅब टेक्निशियन २.गायकवाड शिल्पा प्रभाकर,परिचारीका ३. सुलभा प्रकाश पवळ,परिचारीका ४. अनिता रमेश तोडमल,परिचारीका यांची जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक २४८६दि.४/९/२०१८ अन्वये करारानुसार दरमहा मानध्नावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.१/५/२०१८ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असून सदरची मुदत ही दि.१/११/२०१८ रोजी पासून समाप्त होणा रर आहे.

संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभागासाठी १. शेख नईम युसुफ,लॅब टेक्निशियन २.गायकवाड शिल्पा प्रभाकर,परिचारीका ३. सुलभा प्रकाश पवळ,परिचारीका ४. अनिता रमेश तोडमल,परिचारीका यांची तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी दरमहा रू.११,०००/-या मानधनावर तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.४/११/२०१८ पासून पुढिल सहा महिन्याकरीता अटीव शर्तीनुसार करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार मा.स्थायी समितीची पुर्व मान्यता घेणे उचित होईल.

तरी उपरोक्त प्रकरणी व मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवून मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्तवा हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मुलेखाधिकारी व मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,लेखापरिक्षण विभाग उपायुक्त यांच्या नियंत्रणाखाली काम करू शकते का? याबाबत अधिनियमातील तरतुदीचा अभ्यास करून व उपायुक्त यांनी स्वतःचे अभिप्राय नोंदवून लेखापरिक्षण विभागास सादर करावे अन्यता सदर प्रकरणावर लेखापरिक्षकांकडून अभिप्राय दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.याबाबत वारंवार सुचना करून त्यात बदल होत नसल्याने नाईलाजास्वत पुर्व लेखापिरक्षण बंद करून पोस्ट ऑडिट सुरू करण्यात येईल.याची दखल घेण्यात यावी.

तसेच महाराष्ट्र मनपा (सुधारीत ) अधिनियम २०११ चे कलम ४७ व भारतील लेखा व लेखापरिक्षण विभाग ,महालेखापाल,मुंबई यांचा अहवालसन २००७ परिच्छद ४.३.१ नुसार मुख्य लेखापरिक व आयुक्त ही दोन स्वतंत्र्य कार्यकारी पदे असून उक्त तरतुदीनुसार वरिष्ठ दर्जाच्या वस्वतंत्र्य अस्तित्व असणा-या अधिका-यास कनिष्ठ दर्जाच्या अधिका-याने अभिप्राय देण्याबाबत प्रशासनिक दृष्या संयुक्त ठरत नाही.

उपरोक्त नमुद शासन निर्णय,अधिनियम तरतुदी विचारात घेता तसेच मनपा अधिनियम (सुधारीत ) २०११ मधिल क्र.४७ मधील तरतुदीनुसार संवैधानिक पदाचे कर्तव्ये विचारात घेवून आस्थापना शाखेमार्फत याबाबत उचित निर्देश व्हावेत.

महाराष्ट मनपा अधिनियमातील नियम ५३ प्रमाणे "आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजूरीवाचून कोणतीही तात्पुरती नेमणू सहा महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही.आणिी (लिपीक पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतना एवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या) कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करात येणार नाहि."

वरील अधिनियमातील तरतुदीनसार विभागाला उचित निणय घेता येईल.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,रक्तपेढी विभागात लॅब टेक्नीशियन व परिचारीका यापदी तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरीता पुर्ननियुक्तीचा विषय स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची संमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढी सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारिका यापदी १] शेख नईम युसुफ, लॅब टेक्निशियन ,२] गायकवाड शिल्पा प्रभाकर, परिचारिका,३] सुलभा प्रकाश पवळ, परिचारिका ,४] अनिता रमेश तोडमल, परिचारिका यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारिका यापदी १] शेख नईम युसुफ, लॅब टेक्निशियन ,२] गायकवाड शिल्पा प्रभाकर, परिचारिका,३] सुलभा प्रकाश पवळ, परिचारिका ,४] अनिता रमेश तोडमल, परिचारिका यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारिका यापदी १] शेख नईम युसुफ, लॅब टेक्निशियन ,२] गायकवाड शिल्पा प्रभाकर, परिचारिका,३] सुलभा प्रकाश पवळ, परिचारिका ,४] अनिता रमेश तोडमल, परिचारिका यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मंजूरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर,**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- ५३ सोमवार दिनांक २९/१०/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ मनपा हिश्शामधून एकात्मिक गृह निर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अनुदान हिश्शामध्ये तरतुद वर्ग करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग.

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की,एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्य क्रम (IHSDP) फेज -२ अनुदान या लेखाशिर्षकामध्ये पी.डी.पवार ॲण्ड कंपनी,पुणे यांचे देयक अदा करण्यासाठी मा.आयुक्त यांची मंजूरी घेवून सन २०१७-१८ मध्ये अर्थ विभागाकडे पाठविण्यात आले होते.सदर खात्यामध्ये अनुदान शिल्लक नसल्यामुळे सदरच्या देयक मधील काही रक्कम सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अनुदान या लेखाशिर्षकामधून अदा करण्यात आली आहे. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अनुदान या लेखाशिर्षकामध्ये सन २०१८-१९ करीता रू.२० लाख तरतुद करण्यात आली आहे. सद्यस्थितीत लाभार्थी यांनी त्यांचा लाभार्थी हिस्सा मनपाकडेस जमा केलेला असल्याने देयकामधील उर्वरीत रक्कम अदा करणे आवश्यक आहे. सदर देयकामधील उर्वरीत रक्कम अदा करणे करीता(IHSDP) फेज-२ अनुदान या लेखाशिर्षकामध्ये तरतुद शिल्लक नसल्यामुळे पी.डी.पवार ॲण्ड कंपनी, पुणे यांचे देयक अदा करता येत नाही. सदर बाबत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ मनपा हिश्शामध्ये सन २०१८-२०१९ मध्ये २० लाख तरतुद करण्यात आली असुन २० लाख तरतुद शिल्लक आहे.

तरी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ मनपा हिस्सा मधील २० लाख तरतुदी पैकी १४(चौदा) लाख तरतुद एकातिमक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अनुदान या लेखाशिर्षकामध्ये वर्ग करणेस मंजुरी मिळणेस आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे उपअभियंता प्रकल्प विभाग यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की, (IHSDP) फेज-२ मनपा शिल्लक रक्कम रूपये २०.००लक्ष पैकी रू.१४.००लक्ष तरतुद (IHSDP)फेज-२ अनुदान या लेखाशिर्षकाखाली मा.मुख्य लेखाअधिकारी यांचे अभिप्राय घेवून वर्ग करणेस व पुर्नविनियोजन अंदाजपत्रकामध्ये नोंद घेणे मान्यतेस सादर.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, "अ" मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेप्रमाणे (IHSDP) फेज-२ म.न.पा. हिस्सा रू.२० लाख तरतुदी पैकी रू.१४ लाख तरतुद एकात्मिक गृहनिर्माण झोपडटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ या लेखाशिर्षकामध्ये पुर्नविनियोजन करून व अंदाजपत्रकात घेउन पुढील कार्यवाही करणे योग्य राहील. शासकीय अनुदान (IHSDP) फेज-२ मधील येणे साठी आहे. या वर्षी सदर लेखाशिर्षखाली अपेक्षीत येणे अनुदान २०.०० लक्ष सन २०१८-१९ मध्ये ...... आहे याची खात्री करून फेरसादर करावे.

यावर उपअभियंता यांचा अभिप्राय की, फेर सादर , एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अंतर्गत शासनाचे अनुदान १००% प्राप्त झाले होते व ते १००% अनुदान खर्च ही झाले आहे. त्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सदर करण्यात आले आहे. उपरोक्त प्रस्ताव हा घरकुल योजनेमधील लाभार्थी हिश्शापोटी प्राप्त झालेल्या अनुदानाबाबत असुन मनपाच्या सन २०१८-१९ (IHSDP) फेज-२ अनुदान या लेखाशिर्षकाची तरतुद समाप्त झाली असल्याने मनपा हिस्सा मधील रू.२० लाख तरतुदी पैकी रू.१४ लाख तरतुद एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अनुदान या लेखाशिर्षकामध्ये वर्ग करणेस मंजुरी मिळणेस आदेशार्थ सविनय सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, उपअभियंता यांचे खुलाशाप्रमाणे "अ" प्रमाणे उचित कार्यवाही करणे योग्य राहील मा. स्थाीय समिती मान्यता अधिन राहून वरील "अ" प्रमाणे कार्यवाही करावी.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की, उपरोक्त फेरसादर अहवालाप्रमाणे मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करणेकामी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

****

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ मनपा हिश्शामधून एकात्मिक गृह निर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अनुदान हिश्शामध्ये तरतुद वर्ग करणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- मेहेत्रे साहेब माहिती सांगा.

प्रकल्प विभाग श्री.मेहेत्रे :- एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अंतर्गत शासनाचे अनुदान १००% प्राप्त झाले होते व ते १००% अनुदान खर्च ही झाले आहे. त्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सदर करण्यात आले आहे. उपरोक्त प्रस्ताव हा घरकुल योजनेमधील लाभार्थी हिश्शापोटी प्राप्त झालेल्या अनुदानाबाबत असुन मनपाच्या सन २०१८-१९ (IHSDP) फेज-२ अनुदान या लेखाशिर्षकाची तरतुद समाप्त झाली असल्याने मनपा हिस्सा मधील रू.२० लाख तरतुदी पैकी रू.१४ लाख तरतुद एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अनुदान या लेखाशिर्षकामध्ये वर्ग करावायाची आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अंतर्गत शासनाचे अनुदान १००% प्राप्त झाले होते व ते १००% अनुदान खर्च ही झाले आहे. त्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सदर करण्यात आले आहे. उपरोक्त प्रस्ताव हा घरकुल

योजनेमधील लाभार्थी हिश्शापोटी प्राप्त झालेल्या अनुदानाबाबत असुन मनपाच्या सन २०१८-१९ (IHSDP) फेज-२ अनुदान या लेखाशिर्षकाची तरतुद समाप्त झाली असल्याने मनपा हिस्सा मधील रू.२० लाख तरतुदी पैकी रू.१४ लाख तरतुद एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अनुदान या लेखाशिर्षकामध्ये वर्ग करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अंतर्गत शासनाचे अनुदान १००% प्राप्त झाले होते व ते १००% अनुदान खर्च ही झाले आहे. त्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सदर करण्यात आले आहे. उपरोक्त प्रस्ताव हा घरकुल योजनेमधील लाभार्थी हिश्शापोटी प्राप्त झालेल्या अनुदानाबाबत असुन मनपाच्या सन २०१८-१९ (IHSDP) फेज-२ अनुदान या लेखाशिर्षकाची तरतुद समाप्त झाली असल्याने मनपा हिस्सा मधील रू.२० लाख तरतुदी पैकी रू.१४ लाख तरतुद एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अनुदान या लेखाशिर्षकामध्ये वर्ग करण्यास हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर,**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- ५४ सोमवार दिनांक २९/१०/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१८-२०१९ च्या विद्युत विभागाच्या अर्थसंकल्पीय रकमेमध्ये बदल करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका विद्युत विभाग.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर हद्दीतील सालाबाद प्रमाणे गणेशोत्सव २०१८ साजरा होत आहे.गणेशोत्सव निमीत्त गणेशोत्सव मार्ग व परिसरात सालाबाद प्रमाणे लाईटची व्यवस्था करणे आावश्यक आहे.त्याकामी १०००वॅटचे हॅलोजन,एच.एम.प्रखर लाईट स्वयंचलीत डिजेल जनरेटर लावावे लागेल.मा.जिल्हाधिकारी मिटींग व शांतता कमेटीमध्ये विसरर्जनाच्या रात्रीही प्रमुख विसर्जन ठिकाणी डिजेल जनरेटरसह मार्गावर लावण्याचे आदेश देण्यात आले आहे.तसेच मा.जिल्हाधिकारी साहेबांनी म.रा.वि.कं.मर्या.अ.नगर यांच्या सप्लायामध्ये अचानक बिघाड झाल्यास गणेशोत्सव सणामधील स्वयंचलीत डिजेल जनरेटरसह १००० वॅट हॅलोजन प्रखर लाईट लावण्याकामी मा.जिल्हाधिकारी साहेबांनी यांचे दालनात झालेल्या वरिष्ठ अधिकारी यांच्या समवेत झालेल्या मिर्टींगमध्ये आदेश देण्यात आले आहे.सदर कामाचे सन २०१८-१९ सालाचे टेंडर दर मंजुर नाहीत.सदर काम खाजगी मान्यता प्राप्त अ वर्ग ठेकेदार मार्फत काम करून घेणे गरजेचे आहे.

१. १२५ के.व्ही.ए.डिजेल स्वयंचलीत जनरेटर ऑपरेटरसह नग १ व हॅलोजन १०००वॅट ५० नग एच.एम.आय लाईट १ - १ दिवस बाळाजी बुवाची विहीर नालेगांव अमरधाम
२. १२५ के.व्ही.ए.डिजेल स्वयंचलीत जनरेटर ऑपरेटरसह नग १ व हॅलोजन १०००वॅट ५० नग एच.एम.आय लाईट ४ - १ दिवस सावेडी,यशोदानगर,पाईपलाईन विहीर विसर्जन विहीर
३. ३० के.व्ही.ए.डिजेल स्वयंचलीत जनरेटर ऑपरेटरसह नग १ व हॅलोजन १०००वॅट २० नग २- दिवस नागापूर बोल्हेगांव विहीर
४. ३० के.व्ही.ए.डिजेल स्वयंचलीत जनरेटर ऑपरेटरसह नग १ व हॅलोजन १०००वॅट २० नग २- दिवस केडगांव विहीर

सदरच्या कामापोटी अंदाजे रक्कम रू.१९५०००/- अक्षरी रक्कम रू.१,९५,०००/-हजार फक्त.खर्च अपेक्षित असून सदरचे काम करणेकामी बाजार भावाप्रमाणे कोटेशन दरपत्रके मागविणे योग्य राहिल.तसेच सन २०१८-१९ आर्थिक वर्षातील बजेट रक्कम रू.५००००००/- होती.परंतु सदरची रक्कम ही मागील गेली दिड ते दोन वर्षातील थकीत बिले त्यातुन अदा केल्याने बजेट तरतुद संपलेली आहे.हे ऑडिट विभागाकडून समजले आहे.व प्रत्यक्ष पाहणी केली आहे तरी वरील कामाचा खर्च हा वाढीव तरतुद ग्रहीत धरून करणे आवश्यक आहे.वरील खर्चास व कामास मंजुरी मिळणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

यावर विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,श्री.शिवप्रसाद बजेट तरतुदीसह सादर करा.

यावर विदयुत विभाग श्री.शिवप्रसाद यांचा अभिप्राय की,रिपोर्ट सादर,विषय - विदयुत विभागा कडील वाहतुक नियंत्रण देखभाल व दुरूस्ती या लेखाशिर्षामधील उपलब्ध निधी पैकी रू५,००,०००/- रू.पाच लक्ष विदयुत साहित्य खरेदी या लेखाशिर्षामध्ये वर्ग करणे बाबत.

वरील विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करणेत येतो की,विदयुत विभागाकडील विदयुत साहित्य खरेदी या लेखाशिर्षाका अंतर्गत रू.२९,४४८/- फक्त शिल्लक असल्यामुळे व सन २०१८-१९ या सालातील गणपती,मोहरम उत्सव जवळ आलेला असल्यामुळे सदर उत्सव कालावधी मध्ये विदयुत व्यवस्था करणे गरजेचे असल्यामुळे विदयुत विभागाकडील वाहतुक सिग्नल दुरूस्ती व देखभाल या शिर्षका मधील शिल्लक निधी पैसे रू.५०००००/- रू.पाच लाख हे विदयुत साहित्य खरेदी या लेखाशिर्षका मध्ये जमा करणेस रिपोर्ट सविनय सादर.

यावर इले विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,लेखा विभागाकडे चौकशी केली असता बजेट तरतुद संपलेली असल्याचे दिसते.

कामाची तातडी पाहता या विभागाकडे शिल्लक असलेल्या "वाहतुक सिग्नल दुरूस्ती व देखभाल " या लेखाशिर्षतीलतरतुद अदयाप खर्च झालेली नाही.तसेच वाहतुक सिग्नल दुरूस्ती व देखीभालीसाठी ppp बेसवर कामे दयाचे प्रस्तावित असल्यामुळे तुर्त हा निधी वापरता येईल व नोव्हेंबर २०१८ मध्ये बजेट पुर्नविलोकन वेळी निधी वळता करता येईल.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका संहिता १९७१ मधील नियम ३०(२)प्रमाणे मा.स्थायी समितीच्या मान्यतेस अधिन राहून मुख्यलेखाधिकारी यांच्या अभिप्राय घेवून वरील प्रमाणे उचित निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,थकीत देयके १८-१९ या लेखाशिर्षकातुन अदा करण्यात आल्यामुळे १८-१९ साठी करण्यात आलेली अंदाजपत्रकीय तरतुद संपली आहे.थकीत देयकांसाठी वेगळे लेखाशिर्षक असणे आवश्यक होते परंतु तसे स्वतंत्र्य लेखाशिर्षक ठेवण्यात आलेले नाही.त्यामुळे विदयुत विभाग प्रमुख यांच्या अभिप्रायानुसार व मुख्यलेखापरिक्षक यांच्या शिफारशिनुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या अहवालामधील पान क्र. टि.- २ वरील "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची संमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१८-२०१९ च्या विद्युत विभागाच्या अर्थसंकल्पीय रकमेमध्ये बदल करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- बल्लाळ साहेब माहिती सांगा.

विद्युत विभाग श्री.बल्लाळ:- विदयुत विभागाकडील विदयुत साहित्य खरेदी या लेखाशिर्षाका अंतर्गत रू.२९,४४८/-फक्त शिल्लक असल्यामुळे व सन२०१८-१९या सालातील गणपती,मोहरम उत्सव जवळ आलेला असल्यामुळे सदर उत्सव कालावधी मध्ये विदयुत व्यवस्था करणे गरजेचे असल्यामुळे विदयुत विभागाकडील वाहतुक सिग्नल दुरूस्ती व देखभाल या शिर्षका मधील शिल्लक निधी पैसे रू.५०००००/- रू.पाच लाख हे विदयुत साहित्य खरेदी या लेखाशिर्षका मध्ये जमा करणे करीता स्थायी समिती सभे पुढे विषय घेतला आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे:-थकीत देयके १८-१९या लेखाशिर्षकातुन अदा करण्यात आल्यामुळे २०१८-२०१९ साठी करण्यात आलेली अंदाजपत्रकीय तरतुद संपली आहे. थकीत देयकांसाठी वेगळे लेखाशिर्षक असणे आवश्यक होते परंतु तसे स्वतंत्र्य लेखाशिर्षक ठेवण्यात आलेले नाही.यास जबाबदार कोण आहे ?

विद्युत विभाग प्रमुख श्री.बल्लाळ :- या लेखाशिर्षामधून मागील जुनी देयके अदा करण्यात आली आहे असे समजते.त्यावेळी मी या विभागामध्ये कार्यरत नव्हतो.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- ही अनियमीतता झालेली असून या करीता जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.झालेल्या अनियमीततेबाबत कार्यवाही करून स्थायी समितीस अवगत करण्यात यावे.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सन २०१८-१९ या सालातील गणपती,मोहरम उत्सव जवळ आलेला असल्यामुळे सदर उत्सव कालावधी मध्ये विदयुत व्यवस्था करणे गरजेचे असल्यामुळे विदयुत विभागाकडील वाहतुक सिग्नल दुरूस्ती व देखभाल या शिर्षका मधील शिल्लक निधी पैसे रू.५०००००/- रू.पाच लाख हे विदयुत साहित्य खरेदी या लेखाशिर्षका मध्ये जमा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका सन २०१८-१९ या सालातील गणपती,मोहरम उत्सव जवळ आलेला असल्यामुळे सदर उत्सव कालावधी मध्ये विदयुत व्यवस्था करणे गरजेचे असल्यामुळे विदयुत विभागाकडील वाहतुक सिग्नल दुरूस्ती व देखभाल या शिर्षका मधील शिल्लक निधी पैसे रू.५०००००/- रू.पाच लाख हे विदयुत साहित्य खरेदी या लेखाशिर्षका मध्ये जमा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका संहिता १९७१ मधील नियम ३०(२) नुसार ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर,
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०६

विषय क्रमांक- ५५ सोमवार दिनांक २९/१०/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक -५ बोल्हेगांव कमान ते गणेश चौकापर्यंत रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे या कामाकरिता नागरी क्षेत्रात नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०१७-२०१८अंतर्गत ई - निविदा क्र. १७६३ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा. जिल्हाधिकारी यांची दि.२६/०३/२०१८ १) निविदा प्रसिध्द-दि.२१/०४/२०१८
२] ऑनलाईन ई - निविदा क्र. : १७६३ / सन २०१८-१९ प्राप्त निविदा-१
३] निविदा विक्री कालावधी : दि.२१/०४/२०१८ ते दि.०६/०७/२०१८ २) पहिली मुदतवाढ- दि.०१/०६/२०१८
४] निविदा स्विकारण्याची तारीख :दि.०७/७/२०१८ ते दि.०९/७/२०१८ प्राप्त निविदा-१
५] निविदा उघडण्याची तारीख दि.२४/०८/२०१८ ३) दुसरी मुदत वाढ ३ २८/६/२०१८
६] कामाची मुदत :-८ महिने पात्र निविदा -३, पात्र - १
७] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :- दि.१४/०८/२०१८ च्या तांत्रिक छाननी समिती नुसार

| ई- निविदा क्रमांक | कामाची नांव | निविदा रककम (GST व्यतिरीक्त) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १७६३ | प्र.क्र.५ बोल्हेगांव कमान ते गणेश चौकापर्यंत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | ७२,७०,८९९/- | मे.ए.सी.कोठारी | ७.८९% जादा दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदा धारक मे.ए.सी.कोठारी ,अहमदनगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्टया निविदा दरापेक्षा ७.८९% जादा दराने भरली असून सदर दराची सां.बां.वि.सन २०१७-१८ च्या चालु दरसुचीशी तुलना केली असता निविदा धारकाने भरलेला दर सां.बां.वि.सन २०१७-१८ च्या चालू दरसुचीनुसार ०.०१% जादा येत आहे.व मुळ अंदाजपत्रकात जी.एस.टी. ची रक्कम नमुद असुन निविदा रकमेव्यतिरीक्त सदर रककम वेगळी दिली जाणार आहे.

तथापि निविदा धारक मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर यांनी सदरचे काम चालू दरसुची नुसार करणेस तयार असलेबाबत दि.६/९/२०१८ रोजी लेखी पत्र सादर केले आहे.करिता १. मे.ए.सी.कोठारी ,अहमदनगर यांची निविदा चालू दरसूचीनुसार म्हणजेच रक्कम रूपये ७२,७०,०११/- व जी.एस.टी.ची रक्कम १२ टक्के प्रमाणे रू.८,७२,४०१/- अशी रक्कम रू.८१,४२,४१२/- मंजूर होणेस २) यशस्वी ठेकेदार यांची निविदा मा.स्थायी समितीच्या निर्णयास्तव तथा मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे प्र.उप अभियंता यांचा अहवाल असे

यावर मा.प्र.उपशहर अभियंता यांची स्वाक्षरी

यावर प्र.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार यशस्वी निविदाधारक यांची निविदा,निविदा दराने अधिक जी.एस.टी.सह मान्य करणे योग्य,मा.स्थायी समितीकडे निविदादर मान्यतेस सादर करणेस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.उपशहर अभियंता व शहर अभियंता यांच्या प्रस्तावानुसार पृष्ठ क्र.टि-१ वरील अ प्रमाणे कार्यवाही करणे उचित राहिल.निविदेमधील मुळ अंदाजकिय दर अधिक जी.एस.टी.व्यतीरीक्त या प्रमाणे दर मंजुरीस उचित निर्णय घेता येईल.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्रायक की,पृष्ठ क्र टि-७ वरील अ नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या अहवालाप्रमाणे मान्यतेस्तव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक -५ बोल्हेगांव कमान ते गणेश चौकापर्यत रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे या कामाकरिता नागरी क्षेत्रात नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०१७-२०१८ अंतर्गत ई - निविदा क्र. १७६३ या निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सदर काम कोणत्या योजनेतुन करण्यात येणार आहे.

शाखा अभियंता श्री.पारखे :- नागरी क्षेत्रात नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना सन २०१७-१८ या योजनेतुन प्रस्तावित करण्यात आले आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सदर कामाचे एस्टीमेंट किती आहे.

शाखा अभियंता श्री.पारखे :- रक्कम रूपये ७२ लाख ७० हजार ८९९/- चे आहे.

मा.श्री.सागर बोरूडे :- सदर कामाची निविदा ही ७.८९% जादा दराने भरल्याने प्रशासन जादा दराने काम देण्यास तयार आहे का?

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- जादा दराच्या निविदा महानगरपालिकेचा आर्थिक हिताचा विचार करता स्विकारलेल्या नाहित.

अति.आयुक्त श्री.वालगुडे :- मे.ए.सी.कोठारी, अहमदनगर यांनी सदरचे काम चालु दर सुचीनुसार करण्यातची तयारी दर्शविली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- तसे लेखीपत्र ठेकेदाराने दिले आहे का?

शाखा अभियंता श्री.पारखे :- दि.८/९/२०१८ रोजी लेखी पत्र सादर केले आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- विषय पत्रीकेवरील सदर कामाची रक्कम जास्त दिसते.

अति.आयुक्त श्री.वालगुडे :- सदर काम चालू दर सुची नुसार म्हणजे रक्कम रूपये ७२ लाख ७० हजार ८९९/- व जी.एस.टी.ची रक्कम १२% प्रमाणे रक्कम रूपये ८लाख ७२ हजार४०१ अशी रक्कम रूपये ८१ लाख ४२ हजार ४१२ या मुळे सदर रक्कम जास्त दिसून येत आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक -५ बोल्हेगांव कमान ते गणेश चौकापर्यंत रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे या कामाकरिता नागरी क्षेत्रात नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०१७-२०१८ अंतर्गत ई - निविदा क्र. १७६३ या निविदेच्या निविदा धारक चालू दरसूचीनुसार म्हणजेच रक्कम रूपये ७२,७०,०११/- व जी.एस.टी.ची रक्कम १२ टक्के प्रमाणे रू.८,७२,४०१/- अशी रक्कम रू.८१,४२,४१२/- च्या रकमेच्या कामास मंजूरी देण्यात येत आहे.

**ठराव :-**ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक ५ बोल्हेगांव कमान ते गणेश चौकापर्यंत रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे या कामाकरिता नागरी क्षेत्रात नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०१७-१८अंतर्गत ई -निविदा क्र. १७६३ या निविदेच्या निविदा धारक चालू दरसूचीनुसार म्हणजेच रक्कम रूपये ७२,७०,०११/- व G.S.T.ची रक्कम १२ % प्रमाणे रू.८,७२,४०१/- अशी रक्कम रू.८१,४२,४१२/- च्या रकमेच्या कामास यशस्वी ठेकेदार मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर यांना सदरचे कामाच्या निविदेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर,
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०६

विषय क्रमांक- ५६ सोमवार दिनांक २९/१०/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव स.नं.२२०/२२१ पैकी या जागेत कचरा संकलन वाहतुक करणेकरीता रॅम्प बांधणेचा १४ वा वित्त आयोग सन २०१८-२०१९ अंतर्गत ई-निविदा क्र.-१८५७ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :- मा. जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांची १) निविदा प्रसिध्द-दि.२१/०४/२०१८

२] ऑनलाईन ई - निविदा क्र. :- १८५७/सन २०१७-१८ दि.०८/०८/२०१८ प्राप्त निविदा- निरंक

३] निविदा विक्री कालावधी : दि.०८/०८/२०१८ ते दि.१५/०९/२०१८ २) पहिली मुदतवाढ- दि.३०/०८/२०१८

४] निविदा स्विकारण्याची तारीख :-दि.१९/०९/२०१८ ते दि.२१/०९/२०१८ प्राप्त निविदा-२

५] निविदा उघडण्याची तारीख दि.१५/१०/२०१८ ३) दुसरी मुदत वाढ - २८/६/२०१८

६] कामाची मुदत :-४ महिने पाप्त निविदा -२

७] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :- दि.२६/०९/२०१८ च्या तांत्रिक छाननी समिती नुसार

| ई-निविदा क्रमांक | कामाची नांव | निविदा रककम (GST व्यतिरीक्त) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदा धारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १८५७ | अहमदनगर मनपाच्या नालेगांव स.नं. २२०/२२१ पैकी या जागेत कचरा संकलन वाहतुक करणे करीता रैम्प बांधणे | ४९,१७,४८६/- | मे.ओमसाई कंन्स्ट्र.अहमदनगर | ३.८७ %कमी दराने | मे.गुंजाळ ॲण्ड कंपनी अहमदनगर ५.७०% कमी दराने |
| | | | मे.गुंजाळ ॲण्ड कंपनी अहमदनगर | ५.७० %कमी दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदा धारक मे.गुंजाळ ॲण्ड कंपनी ,अहमदनगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा ५.७०% कमी दराने भरली असल्याने तसेच संबंधित ठेकेदार यांनी कमी दराच्या निविदेबाबत निविदा अटी व शर्तीनुसार युनियन बॅक,अहमदनगर शाखेचा रक्कम रूपये ४९,५००/-चा धनाकर्ष निविदेच्या कालावधीत जमा केला असल्याने मे.गुंजाळ ॲण्ड कंपनी,अहमदनगर यांची ५.७०% कमी दराची निविदा मंजूर होणेस व सदरची निविदा मा.स्थायी समितीच्या निर्णयास्तव तथा मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे

यावर मा.प्र.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,यशस्वी निविदाधारक मे.गुंजाळ ॲण्ड कंपनी अहमदनगर यांची निविदा निविदादरापेक्षा ५.७०% कमी दराची असून निविदा धारक यांनी सुरक्षा रकमेचा धनादेश सादर केला आहे .करिता मे.गुंजाळ ॲण्ड कंपनी,अहमदनगर यांची निविदा मान्यतेसाठी मा.स्थायी समितीची मंजूरी आवश्यक असेलेने निविदा मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे सादर होणे मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,पृष्ठ क्र.टि -२० 'अ' प्रमाणे निविदा रक्कम जी.एस.टी.व्यतिरीक्त ५.७०% कमी दराबाबत उचित निर्णय घेता येईल.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,पृष्ठ क्र.टि-२० वरील अ नुसार मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,उपरोक्त 'अ' प्रमाणे मान्यतेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव स.नं.२२०/२२१ पैकी या जागेत कचरा संकलन वाहतुक करणेकरीता रॅम्प बांधणेचा १४ वा वित्त आयोग सन २०१८-२०१९ अंतर्गत ई- निविदा क्र.-१८५७ या निविदेच्या मंजुरी विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.संजय शेंडगे :- या विषयाला माझा विरोध आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- बांधण्यात येणा-या कचरा रॅम्पला भिंत बांधण्यात येणार आहे.

मा.सभापती साहेब :- नियोजीत जागेपेक्षा लांबच्या जागेवर रॅम्प करा.जेणे करून याचा त्रास होणार नाही.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- सध्या ज्या ठिकाणी रॅम्प आहे तेथे जवळच शाळा आहे.

मा.श्री.सागर बोरूडे :- रॅम्प नागरी वस्ती मध्ये बांधण्यात येवून नये ज्याठिकाणी नागरी वस्ती नाही अशा ठिकाणी बांधण्यात यावा.नालेगांवामध्ये रॅम्प करू नये.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- रॅम्प करीता जागा प्रशासन सुचवेल ते आपले काम नाही.आपण फक्त निविदेला मंजूरी देत आहोत.

मा.श्री.सागर बोरूडे :- जागा कोणकोणत्या ठिकाणी उपलब्ध आहे.या बाबत माहिती सांगा.

अतिरीक्त आयुक्त श्री.वालगुडे :- नगररचनाकार मुंबई येथे गेले आहेत,हा निविदा मंजूरीचा विषय आहे.

मा.सभापती साहेब :- कचरा रॅम्प बाबतची माहिती सांगा.

शाखा अभियंता श्री.निंबाळकर :- या रॅम्पच्या बाजूच्या संरक्षण भिंती १२ फुट उंचीच्या आहेत.या ठिकाणी छोटया वाहनांतून मोठया वाहनामध्ये कचरा टाकून तो मुख्य कचराडेपो वाहून नेला जाणार आहे.

मा.सभापती साहेब :- सदरचा विषय नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने व प्रस्तावातील सर्व कामे,उदा.बांधकाम करणे ,तांत्रीक कामे ही अभियांत्यांनी अत्यंत काळजीपुर्वक जातीने लक्ष घालून करून घ्यावीत.प्रस्तावातील देखभाल दुरूस्ती (डिफेक्ट लायबलीटी ) चा काळ हा दोन वर्षाचा करण्यात यावा.या कालावधीनंतर अनामत रक्कम परत देण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सदयस्थीतीमध्ये म.न.पा.गॅरेज मध्ये रॅम्पची जागा आहे.हे ठिकाण शहराच्या मुख्यरस्त्यावर आहे.या रस्त्यावर अनेक प्रमुख शाळा आहेत.या ठिकाणी कचरा एकत्रीत करतांना दुर्गधी पसरत आहे.या करीता मी सन २०११ पासून पठपुरावा करीता आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- हा अत्यंत महात्वाचा विषय असून या परिसरामधील शाळेचा महानगरपालिकेवर वेळोवेळी मार्चा आलेला असून त्यांनी या कचरा रॅम्प काढण्याकरीता अंदोलने केली आहेत.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव स.नं.२२०/२२१ पैकी या जागेत कचरा संकलन वाहतुक करणेकरीता रॅम्प बांधणे करीता १४ वा वित्त आयोग सन २०१८-२०१९ अंतर्गत ई- निविदा क्र.- १८५७ मधील अंदाजपत्रकीय रकमेच्या ५.७०% कमी दराची निविदाकार मे.गुंजाळ ॲण्ड कंपनी,अहमदनगर यांच्या निविदा दरास ही सभा मान्यता देत आहे.सदर निविदेतील अटी व शर्ती मध्ये दोष दायीत्व कालावधी दोन वर्षाचा करण्यात यावा.सदर विषय हा नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे.सदयस्थीतील रॅम्प बाबत मोठया गंभीर स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त झाल्या तोच विषय या ठिकाणी होवू शकतो.आपल्याला प्रश्नाची सोडवणूक करायची आहे.एका ठिकाणचा प्रश्न सोडवून दुस-या ठिकाणी प्रश्न निर्माण करायाचा नाही. या रॅम्प बांधेणे करीता संरक्षण भिंती,इतर सर्व तांत्रिक कामे ही अत्यंत उष्कृष्ट दर्जाचे झाले पाहिजे.या करीता सदरचे काम झाल्यानंतर त्रेयस्थसंस्थेकडून कामची तपासणी करून काम योग्यअसल्याबाबतचे प्रमाणपत्र घेवून बिल अदा करण्यात यावे.जेणे करून या परिसरामध्ये आरोग्याचा गंभीरप्रश्न निर्माण होणार नाही.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव स.नं.२२०/२२१ पैकी या जागेत कचरा संकलन वाहतुक करणेकरीता रॅम्प बांधणे करीता १४ वा वित्त आयोग सन २०१८-२०१९ अंतर्गत ई- निविदा क्र.- १८५७ मधील अंदाजपत्रकीय रकमेच्या ५.७०% कमी दराचे निविदाकार मे.गुंजाळ ॲण्ड कंपनी,अहमदनगर यांच्या निविदा दरास ही सभा मान्यता देत आहे.सदर निविदेतील अटी व शर्ती मध्ये दोष दायीत्व कालावधी दोन वर्षाचा करून बांधकाम पुर्ण झाल्यानंतर कामाची तांत्रिक तपासणी त्रयस्थ संस्थेकडून करून सदर काम योग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र घेवून देयक अदा करण्यात यावे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर,**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- ५७ सोमवार दिनांक २९/१०/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व . उदयान विभागाकरिता आर.सी.सी. सिमेंट बाकडे पाठीसह- १८४ नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

**संदर्भ :-** ई-निविदा क्र.१८३१

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक उद्यान विभागाकडील जा.क्र.उद्यान विभाग - १५५ दि.०७/०७/२०१८ चे प्रस्तावान्वये सार्वजनिक उद्यान विभागा करिता अहमदनगर महानगरपालिका संपुर्ण हद्‌दीतील विविध ठिकाणी नागरिकांना बसण्याकरिता -

**आर.सी.सी.सिमेंट बाकडे पाठीसह**

साईज -

पाठ - ५' लांब x १२" रुंद x ३" जाड

सीट - ५' लांब x १५" रुंद x ३" जाड

स्टॅण्ड - २४" लांब x १५" रुंद x ४" जाड

बाकडे हेवी नटबोल्ट फिटींगसह व संपुर्ण बेंचेसला प्रायमर पुटटीसह ऑईलपेंटने रंगवुन उद्यान विभागाच्या सुचनेप्रमाणे प्रत्यक्ष ठिकाणी पोहोच करुन बसवून देणेसह याप्रमाणे सविस्तर स्पेसिफिकेशनचे - १८४ नग खरेदीकामी मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ मादाम कामारोड,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक.१ डिसेंबर २०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.४.१ अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन जाहिर टेंडर नोटीस **http://amc. maharashtra. etenders.in** या वेबसाईटवर जाहिर टेंडर नोटीस तसेच जाहिर टेंडर नोटीस प्रथम वेळ मुदतवाढ प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता मुदतीत -

१)अनिल झेड कोठारी,अहमदनगर

२)राजेंद्र लक्ष्मण लोणकर,अहमदनगर

३)सुनिल रामराव राऊत,अहमदनगर

याप्रमाणे एकूण ३ (तीन) निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र.१ - आर.सी.सी.सिमेंट बाकडे उपरोक्त नमुद केलेल्या सविस्तर स्पेसिफिकेशन प्रमाणे रक्कम रु.५,६००=०० / प्रती १ नग हा दर सुनिल रामराव राऊत,अहमदनगर यांचा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेला आहे.स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम निविदा दर धारक सुनिल रामराव राऊत,अहमदनगर यांना दर वाटाघाटी करिता बोलावून दि.२८/०८/२०१८ रोजी झालेल्या मा.प्रशासकिय खरेदी समितीच्या बैठकीत सदरच्या निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यासह संपुर्ण प्रकरण अवलोकनार्थ तथा निर्णयास्तव ठेवण्यात आले असता सदर वेळी स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर असणारे पुरवठादार सुनिल रामराव राऊत हे समक्ष उपस्थित होते.सदरवेळी बैठकीत झालेल्या चर्चेनुसार त्यांनी दर वाटाघाटीनंतर खालील तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दर दिलेले आहेत.सदरचे दर मनपा उदयान विभागाकडील यादीनुसार

प्रत्यक्ष ठिकाणावर पोहोच करुन बाकडा फिटींग करुन देणेसह आहेत.पुरवठादार यांनी बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे लेखी संमतीपत्र दिलेले आहे.त्यांनी निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेल्या खालील प्रमाणे दरास व सदर दराने साहित्य खरेदीकामी येणा-या रक्कम रुपये.८,९२,४००=०० फक्त (अक्षरी रक्कम रुपये.आठ लक्ष ब्यान्नव हजार चारशे फक्तच्या) खर्चास मंजुरी देणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय खरेदी समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

| अ क्र | साहित्याचा तपशिल | परिमाण | प्राप्त निविदातील स्पर्धात्मक दृष्टया सर्वात लघुत्तम दर | दर वाटाघाटी नंतर दिलेले दर | खरेदीकामी येणारा खर्च रक्कम रुपये. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | आर.सी.सी.सिमेंट बाकडे पाठीसह<br><br>**<u>साईज -</u>**<br><u>पाठ -</u> ५' लांब x १२" रुंद x ३" जाड<br><u>सीट -</u> ५' लांब x १५" रुंद x ३" जाड<br><u>स्टँण्ड -</u> २४" लांब x १५" रुंद x ४" जाड<br><br>बाकडे हेवी नटबोल्ट फिटींगसह व संपुर्ण बेंचेसला प्रायमर पुट्टीसह ऑईलपेंटने रंगवुन उद्यान विभागाच्या सुचनेप्रमाणे प्रत्यक्ष ठिकाणी पोहोच करुन फिटींग करुन देणेसह. | १८४ नग | ५,६००/- / प्रती १ नग | ४,८५०/- / प्रती १ नग GST करासह | ८,९२,४००/- |

मा.प्रशासकिय खरेदी समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे सुनिल रामराव राऊत, अहमदनगर यांनी दर वाटाघाटी नंतर दिलेल्या उपरोक्त तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद दरास तसेच सदर दराने कॉलम क्र.२ मध्ये नमुद सविस्तर स्पेसिफिकेशन प्रमाणे आर.सी.सी.सिमेंट बाकडे पाठीसह कॉलम क्र.३ मध्ये नमुद - १८४ नग खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये.८,९२,४००=००फक्त(अक्षरी रक्कम रुपये.आठ लाख ब्यान्नव हजार चारशे)फक्तच्या खर्चास मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांनी दि.२६/०९/२०१८ रोजी मंजुरी दिलेली आहे.

संबंधित निविदाकार यांना स्टोअर विभाग जा.क्र.- ३७४ दि.२९/०९/२०१८ अन्वये निविदा डिपॉझिट रक्कम भरुन करारनामा करुन देणेबाबत कळविले असता त्यांनी दि.०१/१०/२०१८ रोजी निविदा डिपॉझिट रक्कम भरुन दि.०१/१०/२०१८ रोजी संविदा पूर्ण केलेली आहे.

ई-निविदा क्र.१८३१ बाबत केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करणेबाबत स्टोअर विभाग दि.०८/१०/२०१८ चे प्रस्तावावर -

मा.मुख्य लेखाधिकारी यांनी सहमतीदर्शक स्वाक्षरी केलेली आहे.

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी "जा.नं.सा.प्र.वि./निवडणुक-४९९ दि.०३/१०/२०१८ चे मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांचे आदेशान्वये विभागाने खात्री करुन उचित निर्णय घेता येईल"

मा.उपायुक्त(सा.)यांनी " 'अ' नुसार मान्यतेस्तव सादर"
मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांनी "उपरोक्त 'अ' प्रमाणे पुढील कार्यवाही करिता" असा अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सार्व . उदयान विभागाकरिता आर.सी.सी. सिमेंट बाकडे पाठीसह- १८४ नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा. श्री.बाळासाहेब बोराटै :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभागृहात सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- विषयाचे अवलोकन झाले आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- अवलोकन झाले.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अ.नगर महानगरपालिका सार्व . उदयान विभागाकरिता आर.सी.सी. सिमेंट बाकडे पाठीसह- १८४ नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व . उदयान विभागाकरिता आर.सी.सी. सिमेंट बाकडे पाठीसह- १८४ नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर,**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- ५८ सोमवार दिनांक २९/१०/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी उपनगरातील महालक्ष्मी व गंगा उदयानमध्ये नागरीक व युवा पिढीसाठी सेल्फी पॉईट उभारणी करून घेणेकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

**संदर्भ :-** ई-निविदा क्र.१८४६

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी उपनगरातील महालक्ष्मी व गंगा उद्यानमध्ये नागरिक व युवा पिढीसाठी सेल्फी पॉईंट उभारणी उभारणी करणेकामी मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ मादाम कामारोड,हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,मुंबई -४०००३२ दिनांक.१ डिसेंबर २०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.४.१ अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन जाहिर टेंडर नोटीस **http://amc. maharashtra. etenders.in** या वेबसाईटवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन ई-निविदा मागविल्या असता मुदतीत

१)पंकज जे.वाघ,अहमदनगर

२)राजेंद्र लक्ष्मण लोणकर,अहमदनगर

३)सुनिल रामराव राऊत,अहमदनगर

याप्रमाणे एकूण तीन (३) निविदा प्राप्त झालेल्या आहेत. निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता निविदेतील अ.क्र.१ ते २ चे दर पंकज जे.वाघ,अहमदनगर स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेले आहेत.

स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम निविदा दर धारक पंकज जे.वाघ,अहमदनगर यांना दर वाटाघाटी करिता बोलावून दि.२८/०८/२०१८ रोजी झालेल्या मा.प्रशासकिय खरेदी समितीच्या बैठकीत सदरच्या निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यासह संपुर्ण प्रकरण अवलोकनार्थ तथा निर्णयास्तव ठेवण्यात आले असता दर निगोसिएशनसाठी स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर असणारे निविदाकार समक्ष उपस्थित होते.सदरवेळी झालेल्या चर्चेनुसार त्यांनी दर वाटाघाटीनंतर खालील तक्त्यात कॉलम क्र.४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दर दिलेले आहेत.सदरचे दर मनपा सार्व.बांधकाम विभागा कडील प्रस्तावान्वये प्रत्यक्ष ठिकाणी फॅब्रीकेशन वर्क व आर्ट वर्क करुन सेल्फी पॉईंट उभारणी करुन देणेबाबतचे दराप्रमाणे समान आहेत.निविदाकार यांनी बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे लेखी संमतीपत्र दिलेले आहे.त्यांनी निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेल्या खालील प्रमाणे दरास व सदर दराने सेल्फी पॉईंट उभारणी करणेकामी येणा-या रक्कम रुपये.७,१७,६२०=०० फक्त (अक्षरी रक्कम रुपये.सात लाख सतरा हजार सहाशे वीस फक्तच्या) खर्चास मंजुरी देणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय खरेदी समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

| अ क्र | कामाचा तपशिल | प्राप्त निविदातील स्पर्धात्मक दृष्टया सर्वात लघुत्तम दर | दर वाटाघाटी नंतर दिलेले दर | सेल्फी पॉईट उभारणीक ामी येणारा खर्च रक्कम रुपये. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अहमदनगर महानगरपालिकेच्या गंगा उद्यान येथे सेल्फी पॉईंटसाठी कृत्रिम स्वरुपाचे वृक्ष तयार करणे.त्याचे Specification खालीलप्रमाणे<br>**i)** उंची - ६.०० मीटर (२०'००" फुट)<br>**ii)** रुंदी/घेर - ५.५० मीटर (१८'००" फुट) - गोलाकार<br>**iii)** झाडाच्या बुंध्यासाठी/खोडासाठी ०'६" ते ०'३" पर्यंत निमुळता होत जाणारा टयुब्युलर M.S.Pipe एकुण उंची २५'००" फुट.<br>**iv)** झाडांच्या फांद्यासाठी २" इंचापासुन ते १/२" पर्यंत संकल्पित रेखाचित्रानुसार बेंडींग करणे,वेल्डींग करणे,ग्राईडींग करणे इत्यादी.अंदाजे वजन ७०० kg ते ८०० kg M.S.Pipe मध्ये Structure (संरचना) करणे<br>**v)** झाडाच्या पानासाठी अथवा शो साठी लेझर कटींग मध्ये Clover shape मध्ये २० गेज C.R.sheet वापरुन ६०० mm व ४५० mm व्यासाची पाने बनविणे.<br>**vi)** "लव नगर" चे लेटरींग संकल्पित रेखाचित्रात दाखविलेनुसार २'००" उंच २'००" रुंद व ४'००" जाडीचे साधारण : १० ते १२ फुटापर्यंत C.R.sheet मध्ये लेझर कटींग,CO२ वेल्डींग,ग्राईंडींग इत्यादी करुन तयार करणे.<br>**vii)** कृत्रिमरीत्या तयार झालेल्या झाडाला Auto motive Painting करणेसाठी ग्रे प्रायमन,पुट्टी व विविध आकर्षक रंगामध्ये Spray पेंटींग करणे.<br>**<u>सोबत -</u>** संकलित रेखाचित्रानुसार तयार करणे. | ३,४८,०००=००<br>+ १२ % GST<br>३,८९,७६०=०० | ३,७८,०००<br>GST करासह | ३,७८,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अहमदनगर महानगरपालिकेच्या महालक्ष्मी उद्यान येथे सेल्फी पॉईंटसाठी कृत्रिम "लव नगर" नावाचे स्ट्रक्चर तयार करणे.<br>Specification खालीलप्रमाणे - सोबतच्या रेखाचित्रानुसार<br>**i)** उंची - २.५ मीटर<br>**ii)** रुंदी/लांबी - ५.५० मीटर<br>**iii)** जाडी/खोली - ०.३० मीटर<br>- संपुर्ण अद्याक्षरांचे एकत्रित वजन अंदाजे ७०० kg ते ८०० kg.<br>- सकल्पित रेखाचित्रानुसार व ड्रॉईंग नुसार २ mm जाडीचे C.R.Sheet वापरुन "लव NAGAR" उद्याक्षरे दिलेल्या मापांनुसार One piece मध्ये लेझर कटींग करणे,मोल्डींग करणे.CO२ वेल्डींग करणे,अद्याक्षरांच्या आतील बाजुस C.R.Sheet व चॅनल मध्ये व Angle मध्ये मजबुती देणे. अध्याक्षरांना पुढील व मागील बाजुस कुठल्याही प्रकारचा जोड (Joint) येवु न देणे One piece मध्ये तयार करणे.<br>- अक्षरांच्या Foundation साठी १०mm जाडीची प्लेट लावणे तसेच ५०mm x ५०mm x ६mm Angle चा बेस तयार करणे.<br>- प्रत्येक अद्याक्षर चौथ-यावर,गाऊंटींग व बोल्टींग करुन नेमुन दिलेल्या ठिकाणी कायमस्वरुपी बसविणे.<br>- Painting Work - सर्व अध्याक्षरांना जागेवर बसविल्यानंतर मध्ये ग्रे प्रायमर करणे,लांबी पुट्टी करुन कलरींग करणे. | ३,०६,०००=००<br>+ १२ % GST<br>३,४२,७२०=०० | ३,३९,६२०=००<br>GST करासह | ३,३९,६२० |
| | **एकूण रक्कम रुपये.** | | | **७,१७,६२०** |

मा.प्रशासकिय खरेदी समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे पंकज जे.वाघ,अहमदनगर यांनी दर निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेल्या उपरोक्त तक्त्यात कॉलम क्र.४ मध्ये नमुद दरास तसेच सदर दराने कॉलम क्र.२ मध्ये नमुद सविस्तर स्पेसिफिकेशन प्रमाणे फेब्रीकेशन वर्क व आर्टवर्क करुन महालक्ष्मी उद्यान व गंगा उद्यान येथे प्रत्यक्ष ठिकाणी सेल्फी पॉईंट उभारणी करुन घेणेस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये.७,१७,६२०=०० फक्त(अक्षरी रक्कम रुपये.सात लाख सतरा हजार सहाशे वीस) फक्तच्या खर्चास मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांनी दि.२७/०९/२०१८ रोजी मंजुरी दिलेली आहे.

संबंधित निविदाकार यांना स्टोअर विभाग जा.क्र.- ३७५ दि.२९/०९/२०१८ अन्वये निविदा डिपॉझिट रक्कम भरुन करारनामा करुन देणेबाबत कळविले असता त्यांनी दि.०१/१०/२०१८ रोजी निविदा डिपॉझिट रक्कम भरुन दि.०४/१०/२०१८ रोजी संविदा पूर्ण केलेली आहे.

ई-निविदा क्र.१८४६ बाबत केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करणेबाबत स्टोअर विभाग दि.०८/१०/२०१८ चे प्रस्तावावर -

मा.मुख्य लेखाधिकारी यांनी सहमतीदर्शक स्वाक्षरी केलेली आहे.

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी "स्टोअर विभाग प्रमुख व मा.मु.ले.अ.यांचे प्रस्तावानुसार मा पृष्ठ क्र.टी-१८ वरील 'अ' प्रमाणे कार्यवाही करणे उचित राहील"

मा.उपायुक्त(सा.)यांनी "पृष्ठ क्र.टी-१८ वरील 'अ' नुसार मान्यतेस्तव"

मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांनी "उपरोक्त 'अ' प्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समितकडे सादर करावा" असा अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी उपनगरातील महालक्ष्मी व गंगा उदयानमध्ये नागरीक व युवा पिढीसाठी सेल्फी पॉईट उभारणी करून घेणेकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा. श्री.बाळासाहेब बोराटै :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभागृहात सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- विषयाचे अवलोकन झाले आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- अवलोकन झाले.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी उपनगरातील महालक्ष्मी व गंगा उदयानमध्ये नागरीक व युवा पिढीसाठी सेल्फी पॉईट उभारणी करून घेणेकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी उपनगरातील महालक्ष्मी व गंगा उदयानमध्ये नागरीक व युवा पिढीसाठी सेल्फी पॉईट उभारणी करून घेणेकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर,
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०६

विषय क्रमांक- ५९ सोमवार दिनांक २९/१०/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत AHP मोरचुदनगर स.नं. ५ (संजयनगर) येथे २९८ सदनिका विकसीत करणे करीता NGO/NPO/Contractr /Agency ची नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या व प्राप्त होणा-या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्टवर निर्णय घेणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत खाजगी भागीदारीव्दारे परवडणा-या घरांची निर्मीती करणे (AHP) मोरचुदनगर स. न ५ (संजयनगर ) येथे २९८ सदनिका विकसीत करणे करीता NGO/NPO/Contractor/Agency ची नियुक्ती करणे साठी ई- निविदा क्र.१९४५अन्वये मागविण्यातआली आहे. सदर ई-निविदेमध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या असुन तीनही निविदाकारांची तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रे तांत्रिक छाननी समितीकडेस दिनांक २५/१०/२०१८ रोजी सादर करण्यात आले. सदर तांत्रिक छाननी समितीने तांत्रिक लिफाफ्या मधील कागदपत्रांची छाननी करुन तीनही निविदाकारांने आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा व्यापारी लिफाफा उघडणे बाबत शिफारस केली असल्याने खालील प्रमाणे. सदर निविदाकारांची व्यापारी लिफाफा उघडण्यात असून त्यामधील दराबाबतचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| अ. क्र. | एजन्सीचे/ निविदाकाराचे नांव | एजन्सीने /निविदाकाराने व्यापारी लिफाफ्यामध्ये सादर केलेला प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | Curry Stone Design Collaborative | सदर एजन्सीने EOI मध्ये प्रकल्पाकरीता गॅप फंडींग करीता रु.५ कोटी लाभार्थी हिश्शापोटी स्वखर्चाने अनुदान देणे बाबत नमुद केले आहे. तसेच सदर प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार करीता एकुण प्रकल्प रक्कमेच्या १.५ % इतके शुल्क मनपाने एजन्सीस अदा करणे बाबत नमुद केले आहे.त्यानुसार एकुण प्रकल्पाची रक्कम रु. १६३६.१४ लक्ष च्या १.५% नुसार सदरची रक्कम रु. २४.५४ लक्ष इतकी येत आहे. सदरची रक्कम मनपास संबंधित एजन्सी अदा करावी लागणार आहे. |
| २ | A.G. Wable | सदर एजन्सीने मा. शासनाकडून प्राप्त होणा-या अनुदान व्यतीरिक्त लाभार्थी हिस्सापोटीची रक्कम बॅक लोनव्दारे उपलब्ध करुन देणे बाबत नमुद केले आहे. सदर प्रकल्पास एजन्सीमार्फत अनुदाना पोटी कुठलही रक्कम स्वखर्चाने देण्यात येणार नाही. तसेच सदर प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार करीता एकुण प्रकल्प रक्कमेच्या ३ % इतके शुल्क मनपाने एजन्सीस अदा करणे बाबत नमुद केले आहे.त्यानुसार एकुण प्रकल्पाची रक्कम रु. १६३६.१४ लक्ष च्या ३ % नुसार सदरची रक्कम रु. ४९.०८ लक्ष इतकी येत आहे. सदरची रक्कम मनपास संबंधित एजन्सी अदा करावी लागणार आहे. |
| ३ | V.V.Tawale | सदर एजन्सीने मा. शासनाकडून प्राप्त होणा-या अनुदान व्यतीरिक्त लाभार्थी हिस्सापोटीची रक्कम देणग्या किंवा Corporate social responsibility द्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल असे नमुद केले आहे .तसेच सदर प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार करीता एकुण प्रकल्प रक्कमेच्या ५ % इतके शुल्क मनपाने एजन्सीस अदा करणे बाबत नमुद केले आहे.त्यानुसार एकुण प्रकल्पाची रक्कम रु. १६३६.१४ लक्ष नुसार सदरची रक्कम रु. ४९.०८ लक्ष इतकी येत आहे. सदरची रक्कम मनपास संबंधित एजन्सी अदा करावी लागणार आहे. |

वरील एजन्सी/ निविदाकार यांनी गॅप फंडीग व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क बाबत व्यापारी लिफाफ्यामध्ये जे प्रस्ताव सादर केले आहे त्यांची तुलना करता वरील तीन एजन्सी / निविदाकारापैकी Curry Stone Design Collaborative या संस्थेने EOI मध्ये दाखल केलेला प्रस्ताव तुलनात्मक दृष्ट्या सर्वात योग्य व मनपाच्या दृष्टीने हितकारक असल्याचे दिसुन येते.

मोरचुदनगर स. न ५ (संजयनगर ) येथे २९८ सदनिका विकसीत करणे करीता सविस्तर प्रकल्प अहवालानुसार एकुण रक्कम रु.१६३६.१४ लक्ष इतकी आहे. यामध्ये एकुण २९८ लाभार्थीकरीता प्रती लाभार्थी केंद्र शासन हिस्सा १.५ लक्ष व राज्य शासन हिस्सा १ लक्ष असे एकुण रक्कम रु.२.५ लक्ष प्रती लाभार्थी नुसार एकुण रक्कम रु. ७४५ लक्ष इतके अनुदान प्राप्त होणार आहे. एकुण प्रकल्पाची रक्कम रु. १६३६.१४ लक्ष वजा प्राप्त होणारे अनुदान रक्कम रु. ७४५लक्ष जाता रक्कम रु. ८९१.१४ लक्ष लाभार्थी हिश्शापोटी उभी करावी लागणार आहे.त्यानुसार प्रती लाभार्थी रक्कम रु.२.९९ लक्ष इतका लाभार्थी हिस्सा येणार आहे. सदरचा प्रकल्प हा झ ोपडपट्टीमध्ये असल्याने या प्रकल्पातील सर्व लाभार्थी हे झोपडपट्टीधारक असल्याने इतकी रक्कम लाभार्थी भरु शकणार नाहीत. सदरच्या लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती हालाकीची असुन प्रती लाभार्थी घरकुल करीता ५० हजार ते १ लक्ष इतका लाभार्थी हिस्सा भरु शकतील. उर्वरीत रक्कम उभारणी करीता Curry Stone Design Collaborative या संस्थेने सहमती दर्शविली आहे. त्यानुसार Curry Stone Design Collaborative ही संस्था सदर प्रकल्पासाठी ५ कोटी रक्कम स्वखर्चाने देणगी स्वरुपात लाभार्थी हिश्शापोटी देणार आहेत.मनपामार्फत सदर प्रकल्पाकरीता Curry Stone Design Collaborative या संस्थेस प्रकल्पाचे आराखडे तयार करणे, आरसीसी डिझाईन तयार करणे इत्यादी कामांकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC ) पोटी एकुण प्रकल्प रक्कम रु. १६३६.१४ लक्ष च्या १.५ % म्हणजे २४.५४ लक्ष अदा करावी लागणार आहे. सदरची रक्कम मनपाच्या प्रधानमंत्री आवास योजना (मनपा हिस्सा) या लेखाशिर्षकामधुन अदा करता येईल. त्यानुसार Curry Stone Design Collaborative या संस्थेने सादर केलेला प्रस्ताव सर्वात उचित वाटतो.

तरी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत खाजगी भागीदारीव्दारे परवडणा-या घरांची निर्मीती करणे (AHP) मोरचुदनगर स. न ५ (संजयनगर ) येथे २९८ सदनिका विकसीत करणे करीता NGO /NPO /Contractor/ Agency ची नियुक्ती करणे साठी ई- निविदा क्र. १९४५ अन्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे बाबत सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडेस सादर करणेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे उप- अभियंता प्रकल्प अभियांता यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,सदर बाब धोरणात्मक असून ई - निविदा क्रमांक १९४५ करीता प्राप्त प्रस्तावावर निर्णय घेणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादरकरणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,१. विभागाने मनपाच्या प्रधानमंत्री आवास योजना मनपा हिस्सा तरतुद रक्कम प्रस्तावात नमुद केलेली दिसुन येत नाही.या बाबत मा.मुख्यलेखाअधिकारी यांचे अभिप्राय घेणे उचित राहिल.

२. विभागाने प्रस्तावित केल्याप्रमाणे मागील पृ.क्र.T-१२ वरिल बाबत धारणात्मक निर्णय असल्याने मा.स्थायी समिती यांचे मान्यतेसाठी सादर करणेबाबत विभागाने मनपाचे आर्थिक हित लक्षात घेवून उचित निर्णय घेता येईल.

यावर मा.उपायुक्त योचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या अहवालामधिल पान क्र.T-१२ वरिल "अ" प्रमाणे प्रस्ताव मंजूरी करीता मा.स्थायी समितीकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त तथा जिल्हाधिकारी साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत AHP मोरचुदनगर स.नं. ५ (संजयनगर) येथे २९८ सदनिका विकसीत करणे करीता NGO/NPO/Contractr /Agency ची नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या व प्राप्त होणा-या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्टवर निर्णय घेणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या योजनेचे स्वरूप काय आहे.

प्रकल्प विभागा श्री.मेहेत्रे :- मा.प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत खाजगी भागीदारीव्दारे झ ोपडपट्टीतील गोरगरीब जनतेकरीता परवडणा-या घरांची निर्मीती करणे.

मा.श्री.सागर बोरूडे :- या योजनेचा कालावधी किती असणार आहे.

प्रकल्प विभागा श्री.मेहेत्रे :- सदर योजना २ वर्षामध्ये पुर्ण होणार आहे.

मा.श्री.सागर बोरूडे :- एकुण किती लाभार्थी या योजनेमध्ये समावेश आहे.

प्रकल्प विभागा श्री.मेहेत्रे :- यामध्ये एकुण २९८ लाभार्थी

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- या योजनेला शासनाकडून किती अनुदान येणार आहे व लाभार्थी हिस्सा किती असणार आहे.

प्रकल्प विभागा श्री.मेहेत्रे :- या योजने अंतर्गत प्रती लाभार्थी केंद्र शासन हिस्सा १.५ लक्ष व राज्य शासन हिस्सा १ लक्ष असे एकुण रक्कम रु.२.५ लक्ष व प्रती लाभार्थी रक्कम रु.२.९९ लक्ष इतका लाभार्थी हिस्सा असेल.

मा.सभापती साहेब :- या योजनेकरीता करीस्टोन कोलॅब्रिरिटिव्ह हि संस्था किती अनुदान देणार आहे व या योजनेचे लाभार्थी कोणत्या भागातील आहेत.

प्रकल्प विभागा श्री.मेहेत्रे :- सदरचा प्रकल्प मोरचुदनगर स. न ५ (संजयनगर ) येथील झोपडपट्टीमध्ये असल्याने या प्रकल्पातील सर्व लाभार्थी हे झोपडपट्टीधारक असल्याने इतकी रक्कम लाभार्थी भरु शकणार नाहीत. सदरच्या लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती हालाकीची असुन प्रती लाभार्थी घरकुल करीता ५० हजार ते १ लक्ष इतका लाभार्थी हिस्सा भरु शकतील. उर्वरीत रक्कम उभारणी करीता Curry Stone Design Collaborative या संस्थेने सहमती दर्शविली आहे. त्यानुसार Curry Stone Design Collaborative ही संस्था सदर प्रकल्पासाठी ५ कोटी रक्कम स्वखर्चाने देणगी स्वरुपात लाभार्थी हिश्शापोटी देणार आहेत.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :-प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत २९८ सदनिका विकसीत करणेकरीता ई-निविदा क्र.१९४५अन्वये प्राप्त झालेल्या करीस्टोन कोलॅब्रिरिटिव्ह या संस्थेस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार(PMC) शुल्क प्रकल्प रकमेच्या १.५ % दरास मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- करीस्टोन कोलॅब्रिरिटिव्ह या एजन्सी मार्फत संजय नगर येथील घरकुल योजने करीता लाभार्थी हिश्यापोटी रक्कम रूपये ५ कोटी अनुदान प्राप्त होणार असल्यामुळे Curry Stone Design Collaborative या संस्थेचा त्यांनी मनपा मार्फत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्टवर व ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :-प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत खाजगी भागीदारीव्दारे परवडणा-या घरांची निर्मीती करणे (AHP) या प्रकल्पाकरीता मोरचुदनगर स. न ५ (संजयनगर) येथे २९८ सदनिका विकसीत करणेकरीता NGO /NPO /Contractor/ Agency ची नियुक्ती करणेसाठी ई- निविदा क्र. १९४५ अन्वये प्राप्त झालेल्याCurry Stone Design Collaborative या संस्थेस प्रकल्पाचे आराखडे तयार करणे,आरसीसी डिझाईन तयार करणे इत्यादी कामांकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) शुल्क प्रकल्प रकमेच्या १.५ % दरास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर एजन्सी मार्फत संजय नगर येथील घरकुल योजने करीता लाभार्थी हिश्यापोटी रक्कम रूपये ५ कोटी अनुदान प्राप्त होणार असल्यामुळे Curry Stone Design Collaborative या संस्थेचा त्यांनी मनपा मार्फत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्टमध्ये सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार म.न.पा.मार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत खाजगी भागीदारीव्दारे परवडणा-या घरांची निर्मीती करणे (AHP) या प्रकल्पाकरीता मोरचुदनगर स. न ५ (संजयनगर ) येथे २९८ सदनिका विकसीत करणे करीता NGO /NPO /Contractor/ Agency ची नियुक्ती करणे साठी ई- निविदा क्र. १९४५ अन्वये प्राप्त झालेल्या Curry Stone Design Collaborative या संस्थेस प्रकल्पाचे आराखडे तयार करणे, आरसीसी डिझाईन तयार करणे इत्यादी कामांकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) शुल्क प्रकल्प रकमेच्या १.५ % दरास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर एजन्सी मार्फत संजय नगर येथील घरकुल योजने करीता लाभार्थी हिश्यापोटी रक्कम रूपये ५ कोटी अनुदान प्राप्त होणार असल्यामुळे Curry Stone Design Collaborative या संस्थेचा त्यांनी मनपा मार्फत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्टमध्ये सादर केलेल्या प्रस्तावास व ऑफिस रिपोर्टास हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर,**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक-६०                                                                                सोमवार दिनांक २९/१०/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. मुल्ला अताउर रहिमान(ट्रस्टी),गवळी डबरा,६३४४ या मिळकतीचे वॉर्ड क्र.८ बील क्र. ७०२ वरील करआकारणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १३२(१) ब नुसार सन २००३-०४ पासुन बीलाची दुरूस्ती करून रक्कम निर्लेखित करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग

विनंती रिपोर्ट शहर वसुली विभाग कडून देण्यात येतो की, अर्जदार श्री. मुल्ला अताउर रहिमान (ट्रस्टी) यांचे दि.१/१२/२००६ व ९/१०/२०१७ रोजीचे अर्जानुसार वॉर्ड नं.८ बिल नं.७०२ नाव पंचा तर्फे महमंद खुदाबक्ष तांबटकर सदर मिलकतीचे घरपटटी बिलाची धार्मिक जागे प्रमाणे कर आकारणी करणे बाबत इकडेस कळविले आहे. सदर बिलावर आज अखेर रू.४३९५४१/- थकबाकी आहे.

श्री. ट्रस्टी यांचे अर्जानुसार दि.५/१०/२०१८ रोजी सदर जागेची समक्ष पहाणी केली असता सदर जागा वॉर्ड नं.८ बिल नं.७०२ नांव पंचा तर्फे महमंद खुदाबक्ष तांबटकर गवळी डबरा येथे आहे.सदर जागेमध्ये मस्जिद आहे. त्यांची नोंद १५/७/२००१ चे परिशिष्ट अ फॉर्म मध्ये आहे. संपुर्ण जागेचा वापर नमाज पढण्याकरीता व धार्मिक कार्यासाठी होत आहे. सदर जागेचे एकुण क्षेत्र ४०८.७२ चौ.मी. व त्याची RV४४१४१ आहे. सदर जागेमध्ये कुठलाही व्यावसायीक वापर होत नाही. तरी मा. साहेबांनी धार्मिक क्षेत्राला २००३-२००४ पासुन लावण्यात आलेली कर आकारणी माफ करणेस मंजुरी मिळावी. सदर अर्जानुसार समक्ष पहाणी व कलम १३२(१) ब नुसार होणारी वार्षिक मागणी खालील प्रमाणे होत आहे. खालील प्रमाणे होत आहे.

| बिल नं.७०२ धार्मिक जागेप्रमाणे वार्षिक मागणी RV ४४१४१/- | |
|---|---|
| सं.क. | ----- |
| रस्ता कर | ----- |
| ड्रेनेज टॅक्स | २२०७ |
| म.लाभ | ११९ |
| ज.लाभ | ११९ |
| घ. कचरा | २४० |
| वृक्ष | २२१ |
| पाणी पटटी | १५०० |
| शिक्षण कर | ---- |
| एकुण | ४४०६/- |

सदर जागेची पुर्वीची वार्षिक मागणी १६३९८ इतकी होती. जागेची वार्षिक जागेची दुरूस्ती नुसार वार्षिक मागणी ४४०६ इतकी होत आहे. तरी मा. साहेबांनी धार्मिकक्षेत्राला कर आकारणी माफ करणेस मंजुरी मिळावी. सबब महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील निर्देशीत केलेले तरतुदी नुसार कलम १३२(१) ब नुसार दुरूस्ती करणेस तसेच सदरची नोंदी परिशिष्ट अ रिव्हीजन रजिष्टर व संगणकावर घेणेस व सदरची दुरूस्ती सन २००३-२००४ पासुन करणेस मान्यतेस्तव सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा रिपोर्ट असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,धार्मिक क्षेत्राला कलम १३२(१)ब नुसार दुरूस्ती करणे उचित होईल.

यावर मा. प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार दुरूस्तीत आदेशार्थ सादर.

यावर सहा.कर मुल्य निर्धारक यांचा अभिप्राय की, वॉर्ड क्र.८ मधील वसुली लिपिक व कर निरीक्षक यांनी दि.५/१०/२०१८ रोजी समक्ष स्थळ पहाणी करून सादर केलेला अहवाल प्रभाग अधिकारी यांना अभिप्रायानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील निर्देशित केलेल्या तरतुदीनुसार १३२(१) ब नुसार धार्मिक स्थळानुसार दुरूस्ती करणे उचित वाटते आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक, कर निरीक्षक , प्रभाग अधिकारी यांचे प्रस्तावानुसार "अ" प्रमाणे व स.मू.नि.क.सं. अधिकारी यांचे शेरांकानुसार "अ" प्रमाणे १३२(१) ब नुसार कार्यवाही करून उचित निर्णय घेणे योग्य होईल तथापी विलंबाबाबत जबाबादारी निश्चित करावी दि.१/१२/२००६ व दि.९/१०/२०१७ याबाब संबंधीतावर जबाबदारी निश्चित करून स.मू.नि.क.सं. अधिकारी यांचे "अ" प्रमाणे उचित निर्णय घेणे घेता येईल.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी यांचे पाहणी अहवालानुसार ४०८.७२ चौ.मी. क्षेत्र धार्मिक प्रयोजनाकरिता वापरणेत येते यानुसार १३२(१) खाली कार्यवाही करणेस हरकत नाही परंतु रू.४३९५४१/- या आजच्या वसुली रकमपैकी वसुल न होउ शकणारी रक्कम निर्लेखित करणेसाठी स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक विलंबाची जबाबदारी बाबत अहवाल ठेवा शास्ती रकमेचा उल्लेख नाही.

यावर वसुली लिपिक यांचा अभिप्राय की, मा.उपायुक्त (कर) यांच्या दि.१०/११/२०१८ च्या शेरांकानुसार श्री. मुल्ला अताउर रहिमान व इतर (बेंडकुळी मशीद ) वॉर्ड नं.८ बिल नं.७०२ या मशीदीचे धार्मिक स्थळ असल्याने कलम १३२(१) नुसार दि.२/३/२००४ पासुन मा.उपायुक्त यांचा मंजुरीनुसार २००३-२००४ ते २०१८-१९ अखेर रूपये १०५३०८/- थकबाकी आहे. सदरच्या मालमत्ता कर देयकावर आज दि.३१/१०/२०१८ अखेर रूपये ४६३२६२/- इतकी थकबाकी आहे त्यामधून १३२(१) ब नुसार होत असलेली आकारणी (थकबाकीसह) रू.१०५३०८/- उखर्रीत रक्कम रू.३५७९५४/- वसुल न होणारी असल्याने निर्लेखित करण्यासाठी मा. स्थायी समिती समोर ठेवण्यास सदरचा प्रस्ताव आदेशार्थ सादर.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, दि.२०/१०/२०१८ वसुली लिपिक यांच्या प्रस्तावानुसार वसुल न होणारी रक्कम निर्लेखित करण्यास मा.स्थायी समिती समोर ठेवण्यात आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक व कर निरीक्षक यांचे अहवालानुसार प्रस्तावाप्रमाणे १३२(१) ब प्रमाणे रक्कम निर्लेखित करणेबाबत मंजुरीस्तव आदेशार्थ

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मु.ले.प. यांच्या अभिप्रायानुसार व सदरचा विषय मा. स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा. जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

****

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. मुल्ला अताउर रहिमान(ट्रस्टी), वॉर्ड क्र.८ बील क्र. ७०२ वरील करआकारणी कलम १३२(१) ब नुसार सन २००३-०४ पासुन बीलाची दुरूस्ती करून रक्कम निर्लेखित करणेस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-सदर मालमत्तेवर चुकीची आकारीणी झाली आहे.या मशिदीचे ट्रस्टी यांनी दि.१/१२/२००६व ९/१०/२०१७रोजी करआकारणी चुकीची झाल्याबाबत आर्ज दाखल करूनही या अर्जांची दखल मनपाने घेतलेली नाही.झालेली चुकीची आकारणी व दुरूस्ती सन२००३-०४ पासुन बील दुरूस्त करून संबंधितांना देण्यात यावे.जादा दराने केलेली आकारणी निर्लेखित करण्यात यावी.या पुढील काळात धार्मीक स्थळ असल्याने घरपट्टी देण्यात येवू नये.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :-.सदर जागेवर मशिद असून या ठिकाणी फक्त (धार्मीक विधी ) नमाज पठण करण्या करीता करण्यात येते.या जागेत कोणताही व्यवसाय अथवा घरगुती वापराकरीता होत नसल्याने चुकीचे बील दिलेले आहे.सदर मशिदीचे ट्रस्टी यांनी वेळोवेळी अर्ज देवून घरपट्टीची आकारणी कमी करण्याबाबत अर्ज देखील दिले आहेत. शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका वसुली वॉर्ड नं.८ बिल नं.७०२ नांव पंचा तर्फे महमंद खुदाबक्ष तांबटकर, गवळी डबरा येथे असलेल्या जागेमध्ये मशिद असून या जागेचा उपयोग धार्मीक कामा करीता होत असल्याने महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील निर्देशीत केलेले तरतुदी नुसार कलम १३२(१) ब नुसार सन २००३-२००४ ते सन २०१८-१९ अखेर रूपये १०५३०८/- थकबाकी आहे. सदरच्या मालमत्ता कर देयकावर आज दि.३१/१०/२०१८ अखेर रूपये ४६३२६२/- इतकी थकबाकी आहे त्यामधून १३२(१) ब नुसार होत असलेली आकारणी (थकबाकीसह) रू.१०५३०८/- उखरीत रक्कम रू.३५७९५४/- वसुल न होणारी असल्याने निर्लेखित करण्यासाठी दुरूस्ती करणेस तसेच सदरची नोंदी परिशिष्ट अ रिव्हीजन रजिष्टर व संगणकावर घेणेस व सदरची दुरूस्ती सन २००३-२००४ पासुन करणेस मंजूरी देण्यात येत आहे. शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका वसुली वॉर्ड नं.८ बिल नं.७०२ नांव पंचा तर्फे महमंद खुदाबक्ष तांबटकर, गवळी डबरा येथे असलेल्या जागेमध्ये मशिद असून या जागेचा उपयोग धार्मीक कामा करीता होत असल्याने महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील निर्देशीत केलेले तरतुदी नुसार कलम १३२(१) ब नुसार दुरूस्ती करणेस तसेच ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केलेली रक्कम निर्लेखित करण्यास व सदरची नोंदी परिशिष्ट अ रिव्हीजन रजिष्टर व संगणकावर घेणेस मंजूरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर. आणि शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका